# प्रकरण चार

## पशुसंवर्धन विभाग

**4.421 50 टक्के अनुदानावर सुधारित जातीचे म्हैस वाटप.**

**पंचायत समिती मुरबाड, जिल्हा ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11)** - पंचायत समिती मुरबाड, तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे यांनी 50 टक्के अनुदानावर सुधारित जातीचे म्हैस वाटप करणेकामी 23 लाभार्थ्यांकरिता प्रत्येकी रुपये 40,000/- लाभार्थी हिस्सा आणि रुपये 40,000/- अनुदानाप्रमाणे जिल्हा परिषद निधीमधून रुपये 9,80,000/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त 9, दिनांक 31/01/2013 नुसार सक्षम प्राधिकारी यांची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली नाही.

2) योजनेस व्यापक प्रसिध्दी दिल्याचे दिसून येत नाही.

3) लाभार्थ्यांचे अर्ज आणि पंचायत समिती सभापती व गटविकास अधिकारी यांची शिफारस नस्तीस नसल्याने पात्र लाभार्थ्यांचीच निवड करण्यात आल्याची खात्री करता येत नाही.

4) खरेदी समिती गठीत केल्याचे अभिलेख नस्तीस उपलब्ध नाहीत.

5) खरेदी समयी कृषी उत्पन्न बाजार समितीत गटविकास अधिकारी किंवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित असल्याचे दिसून येत नाही.

6) खरेदी करण्यात आलेल्या म्हशींचे आयुर्मान वेगवेगळे असतांना प्रत्येक म्हशीसाठी रक्कम रुपये 80,000/- खर्च करण्यात आलेला आहे.

7) पशुधनाची खरेदी कृषी उत्पन्न बाजार समिती, कल्याण यांचेकडून करण्यात आलेली आहे तर पशुधनाचा विमा पेण, रायगड येथे उतरविण्यात आल्याचे नस्तीवरून दिसून येते. म्हणजेच पशुधनाची प्रत्यक्ष पहाणी न करताच विमा उतरविण्यात आलेला आहे.

8) खरेदी समयी लाभार्थी आणि खरेदी करण्यात आलेल्या पशुधनाचे फोटो नस्तीस नाहीत.

9) योजनेचे शासन निर्णय, मार्गदर्शक तत्वे, प्रशासकीय विभागाचे आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत.

**4.422 जिल्हा परिषद योजनेंतर्गत 50 टक्के अनुदानावर दुधाळ म्हशीचे वाटपाबाबत. (जिल्हा परिषदस्तर)**

**पंचायत समिती जव्हार, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती जव्हारचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात जिल्हा परिषद, पशुसंवर्धन विभागाने जिल्हा परिषद योजनेंतर्गत 50 टक्के अनुदानावर प्रती लाभार्थी रुपये 40,000/- प्रमाणे 13 लाभार्थ्यांना मंजुरी दिली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 23/01/2012 अन्वये लाभार्थ्यास एकाच वेळी दोन जनावरांचा गट वाटप न करता 6 महिन्यांच्या अंतराने किंवा प्रथम दुधाळ जनावर आटल्यानंतर दुसरे दुधाळ जनावर वाटप करावे. पंचायत समितीने अशी कार्यवाही न केल्यामुळे योजना राबवण्याचा मूळ उद्देश सफल झालेला नाही. एकाच वेळी दोन्ही दुधाळ जनावरे आटल्यानंतर सदरच्या जनावरांपासून लाभार्थ्यास 9 महिने काही उत्पन्न मिळत नसल्यामुळे सदरची जनावरे लाभार्थ्याकडून विकण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 210 (ब) नुसार गट विकास अधिकारी यांना फक्त रुपये 500/- अग्रिम मंजुर करण्याचे अधिकार असतांना रुपये 10,40,000/- पशुसंवर्धन अधिकारी यांच्या नावे अग्रीम स्वरुपात काढण्यास गट विकास अधिकारी पंचायत समिती यांनी मंजुरी दिली.

3) पशुसंवर्धन अधिकाऱ्यास रुपये 10,40,000/- मंजुर केलेल्या अग्रीमाची नोंद महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 212 नुसार नमुना 79 अग्रीम नोंदवहीमध्ये नोंद घेण्यात आलेली नाही.

4) शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.305/पदुम-4, मंत्रालय, मुंबई-32, दिनांक 22/11/2011 त्याचप्रमाणे आयुक्त, पुणे यांचे पत्र जावक क्रमांक 4333-4408, दिनांक 05/07/2013 अन्वये सुचना 4 लाभार्थी निवडताना 30 टक्के महिला लाभार्थी निवडीस प्राधान्य देणे अपेक्षित असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

**4.423 संकरीत दुधाळ गाय खरेदी 50 टक्के अनुदान.**

**पंचायत समिती पेण, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती पेण यांचेकडून जिल्हा परिषद फंडातून 50 टक्के अनुदानावर दुधाळ गायी खरेदी करण्यात आलेल्या आहेत. मंजूर तरतुद रूपये 1,50,000/- लाभार्थी हिस्सा रूपये 1,50,000/- एकूण रूपये 3,00,000/- खर्च करणेंत आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थीनी सदर खरेदी करण्यापूर्वी सलग दोन वेळा दुध उत्पादनाची मोजणी करून घेतले बाबत माहिती उपलब्ध झाली नाही.

2) सदर गाय किती महिन्याची दुभती व कितव्या विताची व वासरु सोबत आहे किंवा नाही. याबाबत माहिती प्राप्त झालेली नाही.

3) शासन निर्णय क्रमांक दुध आय.एस.10/2001 प्र.क्र.51/ददुम-4, दिनांक 27/02/2002 नुसार राज्यातील नियमित भरणाऱ्या गुरांच्या बाजारात जनावरांना लाळया, खुरकुत रोग प्रतिबंधक लसीकरण करणे अनिवार्य असतांना सदर खरेदी पावतीवर अशा प्रतिबंधक लसी दिल्याच्या नोंदी आढळल्या नाहीत.

4) संकरीत गाय खरेदी व वाटपासाठी सादर केलेल्या टिप्पणीवर दिनांक नमुद नाही. तसेच गट विकास अधिकारी यांनी दिनांकित स्वाक्षरी केलेली नाही.

5) शासन परिपत्रक वित्त विभाग झेडपीए/2008/प्र.क्र.46/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदेने योजना राबविल्याचे वेळापत्रक दिलेले असून त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 29(4) अन्वये रूपये 1,000/- वरील रक्कमेचे प्रदान धनादेशाने करणे आवश्यक असतांना सदरबाबत प्रदान रोखीने करण्यात आले आहे.

7) शासन परिपत्रक क्र.1082/सी.आर.1974/67 दिनांक 29/07/1993 नुसार विनियोग व उपयोगिता प्रमाणपत्र तपासणीस उपलब्ध झालेले नाहीत.

**4.424 सुधारीत जातीची दुधाळ म्हैस खरेदी (50 टक्के अनुदान) अनियमितता.**

**पंचायत समिती पेण**, **जिल्हा रायगड**, **सन 2014-2015** (**परिच्छेद क्रमांक 28**) **-** पंचायत समिती पेण येथे पंचायत समिती सेस मधून सुधारीत जातीची म्हैस खरेदीसाठी रक्कम रूपये 4,00,000/- अनुदान देण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थाने म्हैस खरेदीच्या वेळेस सलग दोन वेळा दुध उत्पादनाची मोजणी करून खात्री केल्याची माहिती उपलब्ध झाली नाही.

2) म्हशी बरोबर रेडकू असल्याची पावती नाही.

3) विनियोग व उपयोगिता प्रमाणपत्र नाही.

4) लाळ खुरकुत रोग प्रतिबंधक लस देण्यात आल्याची माहिती उपलब्ध झाली नाही.

5) सदरचे प्रदान धनादेशाने न करता रोखीने केले व खरेदीचे वेळापत्रक पाळण्यात आलेले नाही.

6) विमा उशिराने काढण्यात आला आहे.

7) लाभार्थ्याकडून हमी करारनामे घेतलेले नाही.

8) म्हैस खरेदी करण्यापूर्वी 3 महिने आधीचे हेल्थ सर्टिफिकेट देण्यात आलेले नाही.

9) पशुसंवध्रन विभागाकडील पत्र क्रमांक 321,दिनांक 04/03/2014 नुसार स्थानिक बाजारातून

जनावरे खरेदी करू नये असे असतांना स्थानिक बाजारातून खरेदी केली आहे.

**4.425 ॲडमिन फोर्ट व झेडकल लिक्विड औषधे खरेदीमधील अनियमितता.**

**पंचायत समिती खेड, जिल्हा रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** प्रमाणक क्रमांक 32,दिनांक 30/03/2015 अन्वये रक्कम रुपये 99,781/- पंचायत समिती सभा मंजूर टिपणी दिनांक 12/02/2015 नुसार जावक क्रमांक-पंसखे/पंसवि/40/2015, दिनांक 03/01/2015 ने निविदा प्रसिध्द करुन ॲडमिन फोर्ट टॅबलेट व झेडकल लिक्विडसाठी निविदा मागविल्याचे नमूद केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लेखा परिक्षणास निविदेसंदर्भातील अभिलेख लेखा परिक्षणासाठी उपलब्ध झाले नाहीत.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 अनुसूची 2 मधील पंचायत समिती सेस अंतर्गत खरेदी करावयाच्या बाबींमध्ये उपरोक्त बाबींचा समावेश नाही.

3) उपरोक्त औषधांच्या आवश्यकतेच्या पशुसंवर्धन दवाखान्याचे मागणी पत्र व खरेदी केलेल्या औषधांची डिलीव्हरी चलने लेखा परिक्षणास उपलब्ध झालेली नाहीत.

**4.426 50 टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे बाहय योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती सावंतवाडी, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** पंचायत समिती सावंतवाडी पशुसंवर्धन विभागाने जिल्हा परिषद सेस निधीतून 50 टक्के अनुदानावर लाभार्थ्यांना दुधाळ जनावरे वाटप योजनेवर रक्कम रुपये 3,60,000/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयुक्त, पशुसंवर्धन पुणे यांचे पत्र क्रमांक पशुधन-01/81/2009/पं.स.13,पुणे-01, दिनांक 4/9/2009 नुसार योजनेच्या लाभासाठी 33 टक्के महिला लाभार्थ्यांची निवड करावयाची असतांना त्या प्रमाणात महिला लाभार्थ्यांना लाभ दिला नाही.

2) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक सी.डी.एम. 102004/180-43/प्र.क्र.366/-4, दिनांक 04/10/2004 नुसार 01/05/2001 नंतर तिसरे अपत्य असणा-या लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात येवू नये असे आदेश असतांना सदर लाभार्थ्यांचे कुटुंब मर्यादेत असलेबाबतचे दाखले / प्रमाणपत्र नस्तीसोबत उपलब्ध झाले नाहीत.

3) पशुसंवर्धन विभागाकडे लाभार्थ्याचे किती प्रस्ताव प्राप्त झाले. याबाबत विभागाने नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे योजनेच्या लाभासाठी किती प्रस्ताव आले व कोणत्या लाभार्थ्यांची निवड करण्यात आली याची पडताळणी करता आली नाही.

4) पशुसंवर्धन विभागाकडे एकूण 25 लाभार्थ्यांचे अनुदान प्राप्त झाले होते. तथापि विभागाने 22 लाभार्थ्यांना अनुदानाचा लाभ दिला आहे. 3 लाभार्थ्यांचे अनुदान अखर्चित राहिले आहे.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे परिपत्रक दिनांक 02/07/1993 नुसार योजनेचा उददेश सफल होवून क्रयशक्तित वाढ झाल्याची सांख्यिकी माहिती उपलब्ध नाही.

**4.427 अनुसूचित जाती-जमातीच्या लाभार्थ्यांना शेळी गट वाटप व दोन दुधाळ जनावरांचे गट वाटप करणेबाबत (अनुसूचित जाती उपयोजना).**

**पंचायत समिती जुन्नर, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती, जुन्नर यांनी शासन निधीमधून पशुसंवर्धन विभागाकडील जिल्हास्तरीय अनुसुचित जाती उपयोजने अंतर्गत दोन दुभत्या जनावरांचे गट वाटप केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपयो-2011/प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 अन्वये या योजनेचा लाभ मिळणेसाठी लाभार्थ्यांने करावयाच्या अर्जाचा नमुना व त्यासोबतची इतर कागदपत्रे याचा तपशील आयुक्त, पशुसंवर्धन यांनी त्यांचे स्तरावरून निश्चित केलेला आहे. सदर अर्जामध्ये अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे हे लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील असल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असताना असे प्रमाणपत्र सोबत जोडणेत आलेले नाही. त्यामुळे

दुधाळ जनावरांना गट वाटपाचे 75 टक्के अनुदान रूपये 31,899/- व शेळी गट वाट्प 75 टक्के अनुदान रूपये 17,810/- प्रमाणे दिलेली रक्कम रूपये 7,80,460/- वसुल करणे आवश्यक आहे.

2) शेळी गट वाटपाचे 8 लाभार्थी व दुधाळ जनावराचे गट वाटपाचे 20 लाभार्थींची निवड करताना प्रस्तावात त्रुटी असताना सदर अपात्र लाभार्थी निवडले आहेत. त्यांची अनुदानाची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

**4.428 अनुसुचित जाती 75 टक्के अनुदानावर दुधाळ गाय गट वाटपातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती बारामती, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 67) -** पंचायत समिती बारामती सन 2014-2015 या वित्तीय वर्षामधे पशुसंवर्धन विभागाकडील गाय वाटप योजनेचे रक्कम रुपये 21,69,281/- खर्च केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-15 मध्ये एकूण 51 लाभार्थ्यांना दुधाळ गायी खरेदी करून त्यावर रक्कम रुपये 1626998 इतका खर्च करणेत आलेला आहे. महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जीवायो-2011/प्र.क्र.305/पदुम-4/मुंबई, दिनांक 22/11/2011 नुसार सदर योजने अंतर्गत 2 दुधाळ गायी पुरवठा करणेचे असून प्रथम दुधाळ जनावर खरेदी केल्यानंतर 6 महिन्या नंतर 2 रे दुधाळ जनावर खरेदी करणेचे आहे. असे असताना सदर लाभार्थ्यांना प्रथम लाभ माहे- मार्च 2015 मध्ये देण्यात आला असून 2 रा लाभ देणेत आलेला दिसून येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जीवायो-2011/प्र.क्र.305/पदुम-4/मुंबई, दिनांक 22/11/2011 मध्ये योजनेचे आर्थिक निकष अनुसुचित जाती जमातीसाठी 5 टक्के लाभार्थी हिस्सा 20 टक्के बँकेचे कर्ज लाभार्थ्यास या योजने अंतर्गत प्राधान्य देण्यात यावे असे आहे. तशी कार्यवाही केलेली दिसुन येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जीवायो-2011/प्र.क्र.414/पदुम-4/मुंबई, दिनांक 06/092011 नुसार 3 टक्के विकलांग लाभार्थींना या योजने अंतर्गत लाभ देणेत यावेत असे असतानाही विकलांग 3% लाभार्थ्यांना लाभ देणेत आलेला दिसुन येत नाही.

4) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जीवायो-2011/प्र.क्र.305/पदुम-4/मुंबई, दिनांक 22/11/2011 मधील स्तंभ 5 मध्ये प्राप्त झालेला अर्ज आवक नोंद झालेला दिसुन येत नाही तसेच सर्व अर्जांची तारीख निहाय स्वतंत्र नोंद ठेवणेत यावी असे असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

5) वरील शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सुचना क्रमांक 12 नुसार दुधाळ जनावरे खरेदी समितीमध्ये गावातील प्राथमिक सहकारी दुध संस्थेचे प्रतिनिधी, बँक प्रतिनिधी, विमा प्रतिनिधी उपस्थित असलेबाबत त्यांचे स्वाक्षरी दिसुन येत नाही. त्यामुळे शासन निर्णयाचे पालन झालेले नाही.

6) वरील शासन निर्णय मार्गदर्शक सुचना क्रमांक 11 मध्ये योजना शक्यतो क्लस्टर स्वरुपात आणि अस्तित्वातील दुध संकलन मार्गावरील गावामध्ये राबविणेत यावी. लाभार्थींचे जनावरापासुन दुधाचे उत्पादन झाल्याचे, त्यांचे दुध संकलन शासकीय शासकीय योजनेस दिल्याबाबत अहवाल सादर केलेले नाही.

7) वरील शासन निर्णय मार्गदर्शक सुचना क्रमांक 20 मध्ये पशुसंवर्धन विभागाचे विस्तार अधिकारी यांनी वाटप केलेले दुधाळ जनावरांच्या 25 टक्के जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी अहवाल प्राप्त झालेला नाही. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांनी 10 टक्के पडताळणी करणे आवश्यक असताना पडताळणी अहवाल प्राप्त झालेला नाही.

8) या योजने अंतर्गत खरेदी केलेले दुधाळ जनावरांचे महाराष्ट्र ॲनिमल ॲण्ड रेकॉर्डीक ॲथॉरिटी यांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. तसे नोंद केल्याची पडताळणी करता आलेली नाही.

9) वरील शासन निर्णय दिनांक 22/11/2011 मधील मार्गदर्शक सुचना क्र.13 मध्ये दुभत्या जनावरांची खरेदी शक्यतो राज्याबाहेरील नामांकित बाजारपेठेमधून करणे आवश्यक असताना, स्थानिक बाजारपेठेमध्ये खरेदी केल्याचे दिसुन येत आहे.

**4.429 पंचायत समिती स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या कृषी मेळाव्याबाबत.**

**पंचायत समिती पुरंदर, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो/2010/ प्र.क्र.292/10 पदुम-4,दिनांक 30/08/2010 अन्वये प्रदर्शन व प्रचार कार्यक्रम राबविणेची योजना मंजुर करणेत आली असुन व त्यास अनुसरुन अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य यांचेकडील दिनांक 19/07/2015 च्या मार्गदर्शक सुचना या नुसार कार्यवाही करण्याचे निर्देश आहेत त्यानुसार जिल्हा परिषद पुणे यांनी पंचायत समिती पुरंदर यांना त्यांचे कडील आदेश क्रमांक जिप/कृषी/तां.6/45/2015,दिनांक 02/01/2015 नुसार दिनांक 31/01/2015 ते 02/02/2015 च्या कृषी प्रदर्शनासाठी रुपये 3.00 लक्ष अनुदान अदा केलेले आहेत. कृषी विभागाने राबविलेल्या कृषी प्रदर्शन व मेळावा योजनेची नस्ती तपासली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) श्रीम.सोनाली गणेश पवार, कृषी अधिकारी, पंचायत समिती पुरंदर रक्कम 2,50,000/- व श्री.संजय लक्ष्मण पाटोळे. कृषी अधिकारी, पंचायत समिती यांना रक्कम रुपये 50,000/- असे एकूण रुपये 3,00,000/- चा खर्च लेखाशिर्षा तालुका 2401 कृषी मेळावे व कृषी प्रदर्शने जिल्हा परिषद निधी मध्ये खर्ची टाकण्यात आलेला आहे. वरील रकमेचे समायोजन प्रमाणक क्र.459, दिनांक 31/03/2015 अन्वये करण्यात आले आहे.

1. शुअर शॉट इव्हेंट शनिवार पेठ, कराड पाईप लाईन रोड, नगर या संस्थेचे विविध कामासाठी रक्कम रुपये 50000 चे दरपत्रके मान्य करण्यात आले आहेत.

एकत्रित खर्च रुपये 50,000/- चे वर जाणार असताना उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, भाखस-1088/(2512)/उदयोग-6 दिनांक 02/01/1992 व भाखस-1093(2635)/ उदयोग-6,दिनांक 16/07/1993 अन्वये रुपये 50,000/- वरील कामाची निविदा काढणे आवश्यक असताना अशी निवीदा प्रक्रिया न राबवता कामांची विभागणी करुन दरपत्रकानुसार काम दिले आहे.

2) कृषी प्रदर्शन दिनांक 31/01/2015 पासुन सुरु होत असताना संबधित शुअर शॉट इव्हेंटस या संस्थेस आगाऊ उचल रक्कम रुपये 2,50,000/- देण्यात आली या बाबत मुंबई वित्तीय नियम 1959 चे नियम 58 नुसार वित्तीय औचित्याचें नियमांप्रमाणे कामाच्या पूर्ती उचल देणे हे अनुसरुन नसल्याने अनियमितता झालेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 210 (ब) अनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना 1000/- रु. व गटविकास अधिकारी यांना 500/- रुपये अग्रिम देणेचे अधिकार असताना रुपये 2,50,000/- चे अग्रिम देऊन नियमबाहयता झाली आहे.

3) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जीवायो/2010/प्र.क्र.292/10/पदुम-4,दिनांक 30/08/2010 नुसार योजनेची तरतुद असताना पूर्वनियोजन करुन निविदा मागवुन प्रदर्शन व प्रचाराचे कामकाज निवडलेल्या संस्थांना न देता योजनेला मान्यता अंतिम टप्प्यात देऊन निधीचा वापर व विनियोग साचेबध्द व सूत्रबध्द केलेला आढळुन येत नाही. यात उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय भाखस-1088/(2512)/उदयोग-6, दिनांक 02/01/1992 व भाखस-1093(2635)/उदयोग-6, दिनांक 16/07/1993 मधील खरेदी प्रक्रियेबाबतच्या निर्देशाकडे दुर्लक्ष झालेले आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 25(1) व (2) अन्वये 1,000/- रुपये वरील कोणतीही प्रदाने धनादेश व पतपत्राद्वारे देणे नियमानुसार देणे बंधनकारक असताना सदर शासनाच्या वतीने दयावयाची रक्कम रुपये 3,00,000/- रोखीने प्रदान करण्यात आलेल्या आहेत तसेच याबाबत शासन,वित्त विभाग निर्णय क्रमांक संकीर्ण-1010/ प्र.क्र.68/कोषाप्र-5, दिनांक 18/04/2011 व समधारिका शासन शुध्दीपत्रक दिनांक 26/07/2011 नुसार रकमा अदा करताना त्या ईसीएस/एनईएफटीचा वापर करणे बाबत आदेशित केलेले आहे असे असताना रक्कम रोखीने अदा करुन अनियमितता झालेली आहे.

5) कृषी प्रदर्शनात लावण्यात आलेल्या खाजगी स्टॉलधारकांना विनामुल्य स्टॉल देण्याचे प्रयोजन स्पष्ट करण्यात आलेले नाही. सदर स्टॉल करिता झालेला खर्च जसे की मंडप इत्यादी खर्च मोफत देण्यात येवुन जिल्हा परिषद निधीचा अनावश्यक खर्च करण्यात आलेला आहे. संबधित स्टॉल धारकांकडुन त्याचे भाडे वसुलीची कार्यवाही किंवा तसे भाडे आकारणीचे धोरण न ठेवुन नुकसान झालेले आहे. भाडे रक्कम वसुल करणे आवश्यक होते. ज्यांचे

स्टॉल लावण्यात आले त्यांच्याकडुन स्टॉलचे भाडे का आकारण्यात आले नाही. याबाबत मेळाव्यात स्टॉल परवानगी शुल्कासह विनाशुल्क दिली किंवा कसे,विनाशुल्क दिली असल्यास त्याचा उददेश याबाबत विचारणा केली असता त्यावर सदर विभागा कडुन प्राप्त झालेल्या उत्तरात जिल्हा परिषद पुणे यांचेकडून स्टॉल चे भाडे आकारण्याबाबत मार्गदर्शक सूचना पंचायत समिती पुरंदर यांना उपलब्ध झाले नसल्याने स्टॉल चे भाडे आकारण्यात आलेले नाही असे नमूद करण्यात आलेले आहे यात जिल्हा परिषद निधीचा अनावश्यक खर्च करून त्याच्या प्रतिपूर्तीचा कोणताही प्रयत्न करण्यात आलेला नाही.

6) शुअर शॉट इव्हेंटस या संस्थेने पुरवलेल्या सेवेसंदर्भात सेवाकर आकारणी सेवाकर अधिनियमाप्रमाणे निरनिराळया बाबीकरिता विहित असलेल्या दराने करण्यात आलेली नाही. सेवाशुल्क वित्तीय नियम 1994 दिनांक 01/04/2012 अन्वये सदर देयकांवर 12.36 दराने रक्कम रुपये 37,080/- सेवाकर भरणा केलेबाबत अभिलेखे नाहीत.

**4.430 50 टक्के अनुदानावर कडबा कुट्टी यंत्र खरेदी व वाटपाबाबत.**

**पंचायत समिती माण, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती माण यांनी पंचायत समिती सेस निधीतून 50 टक्के अनुदानावर कडबा कुट्टी यंत्र खरेदी करुन वाटपाबाबत रक्कम रुपये 3,74,000/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 नुसार पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावरील योजनांसाठी विहीत वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक पंरास-1084/सीआर1633/57, दिनांक 19/07/1985 अन्वये खरेदीपुर्वी लाभार्थी हिस्सा जमा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

3) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग क्रमांक भांखस/1093/प्र.क्र.239/34, दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 4 अनुसार मास्टर नोंदवही ठेवली नसल्याने दुबार लाभाबाबत पडताळणी करता आली नाही.

4) पुरवठादाराने 45 दिवसांत माल पुरवठा न केल्यास दंडाची तरतूद आहे. माल पोहोच करण्यास 51 दिवस घेतले आहेत. 6 दिवस उशीराबाबत दंड आकारणी केली नाही.

5) शासन निर्णय दिनांक 19/07/1985 अनुसार खरेदीपुर्वी लाभार्थी निश्चित करुन त्यास पंचायत समितीची मंजूरी घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 11 ते 13 नुसार परिषदेने किंवा समितीने रक्कम जमा करणाऱ्यास प्रथम पावती दिली पाहिजे. नंतर रक्कम रोख नोंदवहीस नोंदवून चलनाने समितीच्या खात्यात जमा केली पाहिजे. तथापि पावती व रोखवहीत साहित्य प्राप्त रक्कम चलनाने जमा केली आहे.

**4.431 सेवाशुल्काच्या रक्कमेतून वृक्ष लागवड खडडे खणणे, टेबल क्लॉथ, नॅपकिन इत्यादी नादेय बाबीच्या खरेदीबाबत.**

**पंचायत समिती पंढरपूर, जिल्हा सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पशुसंवर्धन विभाग पंढरपूर यांनी सेवाशुल्काच्या रक्कमेतून रक्कम रुपये 25,855/- एवढया रकमेची खरेदी केलेली आहे. महाराष्ट्र शासन, कृषी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सेवाशुल्क-2010/प्र.क्र.326/पदुम-4,दिनांक 11/10/2010 अन्वये सेवाशुल्काचा विनियोग करण्यासाठीच्या बाबी विहीत केल्या आहेत. त्यानुसार पशुवैदयकीय दवाखाना श्रेणी-1 व श्रेणी-2 व बिगर निवासी इमारतीची देखभाल व दुरुस्ती, पशुवैदयकीय दवाखान्यातील यंत्रसामुग्री, उपकरणे यांची दुरुस्ती व नवीन अत्यावश्यक उपकरणे खरेदी, अत्यावश्यक औषधाची खरेदी, लेखनसामुग्री खरेदी, वीज,पाणी, दुरध्वनी देयकाची अदायगी, संगणकीकरण, नाविण्यपूर्ण योजना व शासन पूरक पत्र क्रमाक सेवाशुल्क 2010/प्र.क्र.326/पदुम-4, दिनांक 30/07/2013 अन्वये औषधाच्या वाहतूकीचा खर्च इत्यादी बाबीवर सेवाशुल्काच्या रक्कमेचा विनियोग करणे आवश्यक आहे. पंचायत समितीने सेवाशुल्काच्या

रक्कमेचा विनियोग स्टेशनरी व सादीलवार इत्यादी बाबींवर केलेला खर्च रक्कम रुपये 25,855/- इतकी वसूल करणे आवश्यक आहे.

**4.432 शेळी गटवाटप योजनेतील अनियमितता. (शासकीय निधी)**

**पंचायत समिती दर्यापूर, जिल्हा अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 18) -** पंचायत समिती दर्यापूरला सन 2014-2015 या वित्तीय वर्षाकरीता शेळी वाटप योजनेअंतर्गत 32 लाभार्थ्यासाठी रक्कम रुपये 11,48,352/- तरतूद प्राप्त झाली, त्यापैकी 19 लाभार्थीसाठी रक्कम रुपये 6,81,834/- खर्च करण्यात आला व रक्कम रुपये 4,66,518/- शिल्लक राहीले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स व्यवसाय विभाग शासन निर्णय क्रमांक जिवायो-2010/प्र क्र 323/पदुम 4/मंत्रालय मुंबई, दिनांक 11/11/2011 नुसार लाभार्थी निवड जिल्हा स्तरावर करावयाची आहे. त्यासाठी पंचायत समिती स्तरावर प्राप्त अर्ज जिल्हास्तरावर पाठविण्यात आले नाही.

2) योजनेची अंमलबजावणी करतांना पुरेशी प्रसिद्धी दिल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणात उपलब्ध झाले नाही.

3) लाभार्थ्यांची गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नाही.

4) लाभार्थी हिस्सा विहीत कालावधीत भरणा करण्यात आला नाही.

5) सन 2014-2015 मध्ये पुरेशी तरतूद उपलब्ध असतांना 13 लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला नाही.त्यामुळे रक्कम रुपये 4,66,518/- अखर्चीत राहीले.

6) श्री.जानराव बजरंग तेलगोटे यांना वाटप केलेल्या शेळी गटातील शेळी मयत झाल्याचे लेखापरीक्षणा दरम्यान लक्षात आले. परंतू कोणत्या टॅग क्रमांकाची शेळी मयत झाली याबाबत पशुधन अधिकारी यांचेकडे माहीती उपलब्ध नाही. तसेच विमा कंपनीकडे भरपाई मिळणेसाठी दावा दाखल केल्याबाबत अभीलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

7) शेळी गट खरेदी केल्याच्या दिनांकास विमा उतरवणे आवश्यक असतांना विलंबाने दिनांक 24/03/2015 व दिनांक 27/04/2015 रोजी उतरवला आहे.

**4.433 कामधेनु दत्तक ग्राम योजना खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती महागाव, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** कामधेनु दत्तक ग्राम योजनेची नस्ती व संबधीत अभिलेख्यांची पडताळणी केली असता यावर रक्कम रुपये 2,37,079/- ऐवढा खर्च नोंदलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पशुपालक मंडळ यांना चहा, नास्ता व भोजनावर एकुण रक्कम रुपये 45,850/- व प्रचार व प्रसिध्दीसाठी एकुण रक्कम रुपये 36,400/- खर्च केला असून सदर बाबत दरपत्रके मागविण्यात आली नाहीत.

2) सदर सहलीकरीता एकुण किती पशुपालक उपस्थित होते हे उपस्थिती पत्रक नसल्यामुळे तपासता आले नाही.

3) तुळजाई बचत गट यवतमाळ, यांचेकडून जनावरांसाठी गवंडा खरेदी केला आहे. पंरतू सदर महिला बचतगटाकडे गवंडा विक्रीस असल्याबाबत खात्री करता आली नाही, गवांडाचा वापर कोठे केला याबाबतचे नस्ती उपलब्ध झाले नाही.

4) कार्यवाहीचा टप्पा क्रमांक 1 नुसार निवडलेल्या दत्तक गावामध्ये दुधाळ व भाकड संकरीत गायी, म्हशीची, देशी गावठी गायी म्हशीची अद्यावत जनगणना करण्यात यावी असे निर्देश असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

5) दत्तक गावाची निवड करतांना सदर गावाची पशुधन / कुक्कट पक्ष्यातील रोग प्रार्दुभाव बाबतची पुर्ण माहिती घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

6) मार्गदर्शक सुचनानुसार पशुपालनांसाठी सहलीचे आयोजन करतांना पशुपालकांना प्राधान्य द्यावे असे असतांना किती पशुपालक सहलीमध्ये सहभागी झाले याबाबत खात्री करता आली नाही. तसेच सहलीला उपस्थित असल्याबाबतचे उपस्थिती पत्रक आढळून आले नाही.

7) बॅनर, माहितीपत्रक तसेच प्लॉस्टीक कापड इत्यादी साहित्य खरेदी केले परंतू सदर साहित्य कोणत्या पशुवैद्यकीय केंद्रात वाटप केले याबाबत साठा पुस्तक उपलब्ध केले नाही.

8) बॅनर,माहीतीपत्रक प्लास्टीक कापड खरेदी केले आहे परंतु सदर साहीत्य कोणकोणत्या पशुवैद्यक केंद्रांना वाटप केले, याबाबत केंद्र निहाय साठा पुस्तक उपलब्ध झाले नाही.

9) अखर्चित रक्कम रुपये 63,921/- शासन खाती भरणा करुन अनुपालन सादर करावे.

**4.434 पशुवैद्यकीय विभागातील पदांना मंजूरी नसतांना नियमबाहय वेतन आहरीत करणेबाबत. (राज्य शासन निधी).**

**पंचायत समिती रामटेक, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शुध्दीपत्रक क्रमांक सुआब-1005/प्रक्र-549/ आस्था, दिनांक 11/07/2005 अन्वये पशुधन पर्यवेक्षकांचे एकच पद मंजूर असतांना एकूण 20 पदांचे वेतन कशाच्या आधारे आहरीत केले याबाबत शासन निर्णयाची प्रत सादर करण्याकरीता अर्धसमास पत्र क्रमांक 13, दिनांक 17/10/2015 देण्यात आले. परंतु शासन निर्णयाची प्रत लेखापरीक्षणास सादर न केल्याने आकृतीबंध मंजूर नसतांना वेतन आहरीत केलेला खर्च रूपये 16,30,812/- लेखापरीक्षणास मान्य नाही.

**4.435 ओपीडीच्या रकमा जमा नसणेबाबत. (शासन निधी).**

**पंचायत समिती भंडारा, जिल्हा भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती, भंडारा, पशुसंवर्धन विभागांतर्गत उपकेंद्राचे अभिलेखे लेखापरीक्षणात तपासण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पशुवैद्यकीय उपकेंद्र, गुंथारा, धारगाव (बा), माटोरा यांचे दिनांक 16/05/2014 ते 15/08/2014 या कालावधीचे ओ.पी.डी. शुल्क शासनखाती भरणा न केल्याचे दिसुन आले. या संदर्भात विचारणा केली असता सर्व उपकेंद्र प्रत्येक महीन्याच्या 15 तारखेला पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती, भंडारा कार्यालयात जमा करीत असतात. विभागीय कार्यालय सदर रक्कम शासनखाती जमा करीत असल्याचे सांगण्यात आले. सदर बाबींची शहानिशा करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाचे पिटी कॅशबुक नमुना 4 सोबत सदर दिनांकित शुल्काचा ताळमेळ करण्यात आला. तर एकुण रक्कम रुपये 8,073/- ची जमा पिटीकॅशबुक मध्ये सापडली नाही व संबंधितांनी लेखापरीक्षणास डी.डी अथवा चलानही उपलब्ध केले नाही. म्हणजेच रुपये 8,073/- चा कायमस्वरुपी अपहार झाल्याचे स्पष्ट होते.

2) पशुवैद्यकीय उपकेंद्र, माटोरा ओपीडी नोंदवहीची तपासणी केली असता दिनांक 08/07/2014 ते 09/07/2014 पर्यंत नोंदवही कोरी असल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले.

3) पंचायत समिती, भंडारा अंतर्गत पशुसंवर्धन विकास अधिका-यांनी केलेल्या अंतर्गत तपासणी दरम्यान सदर बाब त्यांच्या निदर्शनास आली होती काय किंवा कसे? याबाबत कोणताही शेरा बाहयरुग्ण सेवाशुल्क नोंदवहीत दिसुन आला नाही, किंवा नोंदविण्यात आला नाही, किंवा सदरची बाब वरिष्ठांना कळविणे आवश्यक असतांना वरिष्ठांना कळविण्यात आलेली नाही. त्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे अशा बाबीस चालना मिळालेली दिसुन येते.

**4.436 विषेश घटक योजना अंतर्गत अनुसुचित जाती / नवबौध्द लाभार्थांना दुभत्या जनावरांना 100 टक्के अनुदानावर खादय वाटप.**

**पंचायत समिती लाखांदुर, जिल्हा भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 44) -** जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अनुसुचित जाती उपयोजना 2014-2015 विशेष घटक योजनेअंतर्गत अनुसुचित जाती / नवबौध्द लाभार्थ्यींना दुभत्या जनावरांकरीता 100 टक्के अनुदानावर रक्कम रुपये 92,380/- चे खादय वाटप करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांचे पत्र क्रमांक जिपसंअ/ता/1891/14, दिनांक 05/07/2014 अन्वये अनुसुचित जातीच्या लाभार्थ्यांना 100 टक्के दुभत्या जनावरांना खादय पुरवठा करणेसाठी लाभार्थीकडुन दिनांक 07/07/2014 ते 08/08/2014 पर्यंत अर्ज प्राप्त करावयाचे होते. पशुधन विकास अधिकारी यांनी दिनांक 10/08/2014 पर्यंत जिल्हा परीषदेला अर्ज करावयाचे असताना विहीत वेळापत्रकानुसार कार्यवाही केली नाही.

2) सदर योजनेदवारे दुधाळ जनावरांना खादय वाटप करावयाचे आहे. परंतु श्री गणेश रतीराम मेश्राम, रा. विरली(बु), श्री. प्रमोद कांबळे, रा. मुरमाडी, श्री. दिलीप नंदागवळी, रा. चिकाना, श्री. शिवनंदन राउत, रा. दिघोरी मोठी, श्री. विलास रामटेके, रा. गुंजेपार यांच्याकडील दुधाळ जनावरांकरीता खादय वाटप न करता भाकड जनावरांसाठी खादय वाटप करण्यात आले. त्यामुळे 3 गायीकरीता 150 किलो प्रमाणे 450 किलो व म्हशीकरीता 225 किलो प्रमाणे 450 किलो असे एकुण 900 किलोच खादय भाकड जनावरांना वाटप करण्यात आले. सदर योजनेचा उददेश सफल झाला नाही. व रुपये 14.90/- दराने 900 किलो चे रक्कम रुपये 13,410/- चे आर्थिक नुकसान झाले.

3) योजनेची प्रचार प्रसिध्दी न केल्यामुळे सर्वसामान्यांना योजनेचा लाभ घेता आला नाही.

**4.437 निविदा मागविण्याबाबतचे कोणतेही मापदंड पाळलेले नाही.**

**पंचायत समिती चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 34) -** कामधेनु दत्तक ग्राम योजना अंतर्गत निकृष्ठ चारा सकस करणे, खत व्यवस्थापन व नाविन्यपुर्ण योजना राबविणे इत्यादी या योजने अंतर्गत रुपये 1,80,000/ खर्च करण्यात आले त्यासाठी 12 गावाची निवड केली आणि त्यांना लाभ दिला. यासाठी तीन निविदा मागविल्या त्यातुन माऊली बहुउद्देशिय ग्रामिण विकास संस्था, वायगाव या संस्थेची निविदा मंजुर करुन सबंधित संस्थेला काम दिले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

1) लाभार्थी निवडीचे वेळापत्रक अवलंबिलेले नाही.

2) निविदा कोणत्या फर्मकडुन किंवा जाहीर निविदा, दरपत्रके मागविण्याबाबत कोणतेही मापदंडे वारलेले नाही. दोन निविदा सेवाभवी संस्थेच्या व एक खाजगी व्यक्तीची निविदा प्राप्त झालेली आहे. एका खाजगी व्यक्तीची आहे. सेवाभावी संस्थाकडुन निविदा प्रमाणपत्र आणि त्या संस्थेला यापुर्वीचा अनुभव व त्याच्या बायलॉजमध्ये अशा प्रकारची सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत धर्मदाय संस्थेची मान्यता असलेल्या पुरावा नस्तीसोबत नाही. ज्या खाजगी संस्थेनी दरपत्रके भरली ती संस्था खरच या कामाची पात्र आहे काय? याची शहानिशा करणारा पुरावा नाही. त्याचेकडे व्हॅट क्रमांक, पॅन क्रमांक नस्तीमध्ये आढळुन आला नाही.

3) एकुण कामाचे मुल्य प्रत्येक योजनेला रुपये 50,000/- च्या वर आहे कोणतेही खरेदी, सेवा रुपये 50,000/- च्यावर असेल तर महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक, भाखस/1088/2512/उद्योग-6,दिनांक 02/01/1992 च्या शासन निर्णयानुसार वर्तमानत्रात देवुन व्यापक प्रसिध्दी जरुरी होते परंतु तसे करण्यात आलेले नाही.

4) योजना राबवितांना प्रत्यक गावाचे वेगवेगळे दयेक घेण्यात आली असली तरी सेवा पुरविण्यासाठी चा आदेश संवर्ग विकास अधिकाऱ्याने दिली. संवर्ग विकास अधिकारी यांनी एकत्र शोधन केले त्यामुळे जाहिर निविदा न मागविता दरपत्रके मागवुन काम दिलेले आहे जे नियमबाहय आहे.

5) दरपत्रके दिनांक 26/11/2015 ला मागविली आणि प्रत्यक्ष दरपत्रके दिनांक 22/11/2014 ला प्राप्त झाली म्हणजे मागविण्यापूर्वीच सबंधित संस्थेनी दरपत्रके कार्यालयात कशी सादर केली आणि संवर्ग विकास अधिकाऱ्यांनी कशी स्विकारली व त्यावर पुरवठा आदेश कसे काय दिले याचा खुलासा होणे जरुरी आहे.

6) प्रशिक्षण यशस्वीरित्या पार पडले व त्याचा शेतकऱ्यांना (लाभार्थींना) लाभ झाला किंवा कसे याबाबत सक्षक प्राधिकाऱ्यांचे उपयोगीता प्रमाणपत्र नस्तीला आढळले नाही.

**4.438 वैरण बियाणे वाटपाबाबत 50 टक्के अनुदानावर**

**पंचायत समिती मुल, जिल्हा चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 37) -** 50 टक्के अनुदानावर वैरण बियाणे 1,152 किलो रुपये 59,904/- किंमतीचे पशुवैद्यकिय दवाखान्यानुसार वाटप केल्याचे साठा पुस्तक पान क्रमांक 67 वर दर्शविले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वितरीत केलेल्या उपकेन्द्राने कोणत्या लाभार्थ्यांना बियाणांचे वाटप केले. याबाबतचा सविस्तर अहवाल त्यांचेकडुन मागविण्यात आला नाही.

2) 50 टक्के लाभार्थी हिस्सा जमा केल्याबाबत नोंद नाही.

3) शासन निर्णय जि वाये-2010/प्र.क्र.340/पदुय-4 मंत्रालय, मुंबई दिनांक 30/08/2010 नुसार लाभार्थ्यांकडे शेतजमीन व सिंचनाची सुविधा असणेबाबत 7/12 जोडलेला नाही.

**4.439 50 टक्के अनुदानावर एक दिवसीय सुधारीत कुक्कूट गट 1 युनिट 100 वाटप योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती गडचिरोली, जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजना अंतर्गत 50 टक्के अनुदानावर एक दिवसीय सुधारीत कुक्कूट पक्षांचा पिल्लांचे गट 1 सुनिट 100 वाटपावर प्रमाणक क्रमांक 1639 दिनांक 31/03/2015 अन्वये रूपये 16,000/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सहाय्यक आयुक्त प्रादेशिक अंडी उबवणी केन्द्र नागपुर, यांचे बिल क्रमांक 20 दिनांक 16/03/2015 अन्वये 8 कुक्कूट पक्षी गट 1 युनिट 100 प्रती गट रूपये 2,000/- प्रमाणे भरणा करण्यात आलेले असतांना लेखापरिक्षण पुर्ण दिनांक 13/10/2015 पर्यंत 8 कुक्कूट पंक्षी गटांना पुरवठा झालेला नसतांना व त्याची साठापंजीवर प्राप्त झाल्याची सुध्दा नोंद नसतांना पशुधन विकास अधिकारी यांनी कशाच्या आधारे देयकावर प्रमाणपत्र दिलेले आहे. कुक्कूट पंक्षी गट प्राप्त होणेपुर्वी खोटे प्रमाणपत्र देऊन सहाय्यक आयुक्त प्रादेशिक अंडी उबवणी केंद्र नागपुर यांना रक्कम रूपये 16,000/- चे शोधन करणे ही अत्यंत गंभिर अनियमितता असुन साहित्य प्राप्त होणेपुर्वी रक्कमेचे शोधन केल्यामुळे संबंधीतावर जबाबदारी निश्चित करून सदर रक्कम वसुल का करण्यात येऊ नये. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली, यांचे पत्र क्रमांक जिपगड/971 /2015 दिनांक 11/03/2015 प्रमाणे 33 टक्के महिला लाभार्थी निवड करावयाची असतांना महिला लाभार्थीची निवड न केल्यामुळे अनियमितता झालेली असुन 33 टक्के महिला लाभार्थी लाभापासुन वंचित राहिलेल्या आहेत.

3) निवड केलेल्या 8 लाभार्थीस लेखापरिक्षण दिनांकापर्यंत लाभ मिळालेला नसल्यामुळे शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र. 41/33, दिनांक 17/01/2001 मध्ये नमुद केल्यानुसार योजनेचे लाभार्थी निवडीपासुन ते प्रत्यक्ष लाभ देण्यापर्यंत वेळापत्रक पाळण्यात आलेले नाही. त्यामुळे 8 लाभार्थी लाभापासुन वंचित राहिल्याने त्यांना आर्थिक वर्षात लाभ मिळालेला नाही.

4) लाभार्थी निवड यादी मंजुर होवून अदयापही प्राप्त नाही. लाभार्थ्यांचे अर्ज अदयावत नाही. लाभार्थ्यांकडून अदयापही 50 टक्के लाभार्थी हिस्सा प्राप्त झालेला नाही. त्यामुळे सदर योजना यशस्वी झालेली नाही.

**4.440 50 टक्के अनुदानावर चिकमॅश पशुखादय खरेदी वाटपातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती गडचिरोली, जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** बिगर आदिवासी योजनेअंतर्गत 50 टक्के अनुदानावर चिकमॅश वाटप यावर प्रमाणक क्रमांक 1639 दिनांक 31/03/2015 अन्वये रूपये 47,600/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 50 टक्के अनुदानावर 8 लाभार्थी 1 युनिट 100 पक्षी प्रत्येकास पुरवठा करणे करीता योजना राबविण्यात आली. सदर पशुखादय खरेदी केल्याबद्दल त्याची साठा नोंद घेण्यात आलेली आहे. परंतु लेखापरिक्षणाची तारीख दिनांक 13/10/2015 पर्यंत सदर पशुखाद्य वाटप झालेले नाही. यामुळे अनियमितता झालेली आहे.

2) उपरोक्त आदेशाप्रमाणे 8 लाभार्थीस प्रत्येकी 1 युनिट 100 पक्षी वाटप करावयाचे असतांना लेखापरिक्षण दिनांकापर्यंत कुक्कूट पक्षी प्राप्त न झाल्यामुळे लाभार्थीस पक्षी वाटप झालेले नाही. त्यामुळे 8 लाभार्थीस लाभ मिळालेला नाही. त्यामुळे खरेदी केलेले किट 1700 मॅट्रिकटन चिकमॅश किलो वाटप केले नाही. त्यामुळे सदर साहित्य विनाकारण खरेदी होवून पडून आहे. त्यामुळे सदर साहित्य खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) लाभार्थी निवड यादी मंजुर होवुन अदयापही प्राप्त नाही. लाभार्थ्यांचे अर्ज अदयावत नाही. लाभार्थ्यांकडून अद्यापही 50 टक्के लाभार्थी हिस्सा प्राप्त झालेला नाही. त्यामुळे सदर योजना यशस्वी झालेली नाही.

4) निवड केलेल्या 8 लाभार्थीस लेखापरिक्षण दिनांकापर्यंत लाभ मिळालेला नसल्यामुळे शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र. 41/33 दिनांक 17 जानेवारी 2001 मध्ये नमुद केल्यानुसार योजनेचे लाभार्थी निवडीपासुन ते प्रत्यक्ष लाभ देण्यापर्यंत वेळापत्रक पाळण्यात आलेले नाही. त्यामुळे 8 लाभार्थी लाभापासुन वंचित राहिल्याने त्यांना आर्थिक वर्षात लाभ मिळालेला नाही.

**4.441 बिगर आदिवासी उपयोजना एकात्मिक कुक्कूट विकास योजना एक दिवसीय कुक्कूट पक्षयांचा पिलांचे गट वाटप योजनेअंतर्गत पशुखादय (चिकमॅश) खरेदी करून वाटप करणेबाबत.**

**पंचायत समिती कुरखेडा, जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर योजने अंतर्गत प्रमाणक क्रमांक 1299 दिनांक 31/03/2015 अन्वये रूपये 61,600/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पशुखादय वाटप केलेल्या लाभार्थ्यांची निवड यादी व अर्ज अभिलेख्यांत नसल्यामुळे निवड केलेल्या लाभार्थ्यांची सत्यपना करता आले नाही.

2) पशुखादय प्राप्त झाल्याची नोंद साठापुस्तकाचे पान क्रमांक 4 वर घेण्यात आले आहे. परंतु कोणाला व केव्हा/कधी वाटप केले याबाबत साठापुस्तकात लाभार्थ्यांच्या नावांची व दिनांकाची नोंद नाही. तसेच 10 लाभार्थ्यांना प्राप्त झालेली पशुखादयाचा उपयोग घेत असल्याबाबत संबंधित लाभार्थ्यांकडून स्वाक्षरीसह उपयोगीता/विनियोग प्रमाणपत्र घेण्यात आल्याचे अभिलेख्यांत आढळले नाही.

3) बिगर आदिवासी उपयोजना अंतर्गत लाभ देण्यात आलेल्या लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्याला दुबार लाभ न दिल्याची सत्यपना करता आले नाही.

4) सन 2014-2015 चे मार्गदर्शक सुचनेनुसार लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची माहिती संबंधीत ग्रामपंचायतीस आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे अभिलेख्यात आढळले नाही.

**4.442 अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना 75 टक्के अनुदानावर शेळी गट वाटप करणेबाबत.**

**पंचायत समिती कुरखेडा, जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदर अनुदानाअंतर्गत एकुण रूपये 3,92,700/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन आदेशान्वये, लोकसंख्या धोरणानुसार सन 2001 पासुन तीन (3) अपत्ये असलेल्या लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात येऊ नये असे असतांना (1) श्री.यशवंत गणेश उईके यांना राशन कार्ड प्रमाणे 3 अपत्ये असल्याचे आढळले (2) श्री.केशव सावजी नैताम यांना राशन कार्ड नुसार चार(4) अपत्ये असल्याचे आढळले. त्यामुळे त्यांना देण्यात आलेला लाभ वसुलपात्र ठरतो.

2) 11 लाभार्थ्यांकडून स्वाक्षरीसह उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात आल्याचे अभिलेख्यात आढळले नाहीत.

3) योजनेअंतर्गत दरवर्षी लाभ देण्यात येतो परंतु लाभ देण्यात आलेल्या लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्याला दुबार लाभ न दिल्याची सत्यपना करता आले नाही.

**4.443 विशेष घटक योजनेअंतर्गत जनावरांना खादय अनुदान देणे मधील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती आरमोरी, जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 34) -** सन 2014-2015 मध्ये विशेष घटक योजने अंतर्गत दुभत्या जनावरांना खादय वाटप करणेस्तव प्रमाणक क्रमांक 1097 दिनांक 31/03/2015 अन्वये रूपये 90,000/- खर्च करण्यात आले. सदर योजनेच्या दस्तऐवजाचे लेखापरिक्षण केले असता, खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी निवड अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक पशुधन-1/मा.क्र./4754/2011/पं.स.13,दिनांक 22/07/2011 चे मार्गदर्शक सुचनेनुसार व्यापक प्रसिध्दी देऊन अर्जाची छाननी करून ग्रामपंचायतीची शिफारस घेऊन पारदर्शक पध्दतिने लाभार्थी निवड होणे आवश्यक असतांना तसे न करता लाभार्थीकडून मागणी अर्ज घेऊन पशुखादयाचे वाटप केलेले आहे. लाभार्थी निवडीला मंजुरी प्राप्त केल्याचे आढळुन आले नाही. तसेच जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचेकडे लाभार्थीची अर्ज पाठवून त्यांची तांत्रिक मंजुरी प्राप्त केली नाही.

2) लाभार्थी निवड करतांना 3 टक्के विकलांग लाभार्थ्यांना प्राधान्य देणे आवश्यक असतांना विकलांग लाभार्थीची निवड केलेली नाही.

3) लाभार्थ्यांचे विनियोजन प्रमाणपत्र लेखापरिक्षणाचे वेळी आढळुन आले नाही.

4) अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शक सुचना बाबतचे पत्र दिनांक 22/07/2011 नुसार अट क्रमांक 7 नुसार लागोपाठच्या दोन वेतामध्ये भाकड कालावधीसाठी प्रत्येक म्हशीसाठी 225 किलो, गाईसाठी 150 किलोग्रॅम पशुखादय 100 टक्के सुटीवर लाभार्थ्यांना दयावयाचे आहे. तसेच अट क्रमांक 8 नुसार गाभन काळात शेवटच्या दोन महिण्यासाठी अतिरिक्त 90 किलो पशुखादय 100% अनुदानावर वाटप करण्याचे आहे. परंतु 4470 किलोग्रॅम ऐवजी 6000 किलोग्रॅम वाटप केल्याने 1230 किलोग्रॅम खादय लाभार्थ्यांना जादा खादय वाटप केलेले आहे. त्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे.

5) श्री.नरेन्द्र खुशाल शेंडे वासाळा व खुशाल रामजी शेंडे वासाळा दोन्ही लाभार्थी यांचे ग्रामपंचायत दाखले नाही. दोन्ही लाभार्थी एकाच कुटूंबातील आहे. तसेच सौ.उत्तरा रामटेके यांचे ग्रामपंचायतचे प्रमाणपत्र नाही.

**4.444 विशेष घटक योजना अंतर्गत जनावरांना खाद्य अनुदान देणेमधील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती धानोरा, जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** सन 2014-2015 मध्ये विशेष घटक योजने अंतर्गत दुभत्या जनावरांना खादय वाटप करणेकरीता प्रमाणक क्रमांक 1362 दिनांक 31/03/2015 अन्वये रूपये 75,000/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी निवड अतिरीक्त आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक पशुधन-1/मा.क्र./4754/2011/पं.स.13, दिनांक 22/07/2011 चे मार्गदर्शक सुचनेनुसार व्यापक प्रसिध्दी देऊन अर्जाची छाननी करून ग्रामपंचायतीचे शिफारस घेऊन पारदर्शक पध्दतीने लाभार्थी निवड होणे आवश्यक असतांना तसे न करता लाभार्थीकडून मागणी अर्ज घेऊन पशुखादयाचे वाटप केलेले आहे. लाभार्थी निवडीला मंजुरी प्राप्त केल्याचे आढळुन आले नाही. तसेच जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचेकडे लाभार्थीची अर्ज पाठवुन त्यांची तांत्रिक मंजुरी प्राप्त केली नाही.

2) लाभार्थी निवड करतांना 30 टक्के महीला व 3 टक्के विकलांग लाभार्थी ना प्राधान्य देणे आवश्यक असतांना एकही महिला व विकलांग लाभार्थीची निवड केलेली नाही.

3) लाभार्थीची विनियोजन प्रमाणपत्र लेखापरिक्षणाचे वेळी आढळुन आले नाही.

4) अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शक सुचना बाबतचे पत्र दिनांक 22/07/2011 नुसार अट क्रमांक 7 नुसार लागोपाठच्या दोन वेतामध्ये भाकड कालावधीसाठी प्रत्येक म्हशीसाठी 225 किलो पशुखादय 100 टक्के सुटीवर लाभार्थ्यांना दयावयाचे आहे. तसेच अट क्रमांक 8 नुसार गाभण काळात शेवटच्या दोन महिन्यासाठी अतिरिक्त 90 किलो पशुखादय 100 टक्के अनुदानावर करण्याचे आहे. परंतु जादा खादय वाटप केल्याने 9,075/- रूपयाचे शासनाचे नुकसान झाले आहे.

**4.445 चिकफीड 50 टक्के अनुदानावर खरेदी वाटपातील अनियमित खर्चाबाबत.**

**पंचायत समिती मुलचेरा, जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** बिगर आदिवासी योजनेअंतर्गत 50 टक्के अनुदानावर चिकफीड खरेदी यावर रूपये 63,600/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 50 टक्के अनुदानावर 8 लाभार्थी 100 पक्षी प्रत्येकी पुरवठा करने करीता सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन प्रादेशिक अंडी उबवणी केन्द्र नागपुर यांना कळविले असतांना लेखापरिक्षण पुर्ण दिनांकापर्यंत पक्षी पंचायत समितीला प्राप्त झाली नाही. परंतु पशुधन विकास अधिकारी, विस्तार, पंचायत समिती मुलचेरा, यांनी पक्षी प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र बिल क्रमांक 17 दिनांक 16/03/2015 वर देण्यात आले व बिल मंजुर करून रक्कमचे शोधन करण्यात आले ही नियमबाह्यता पंचायत समितीने केलेली आहे.

2) मे.व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य कृषी विकास महामंडळ मुंबई यांचे ईन्वाईस नंबर पी-30 दिनांक 30/03/2015 चिक मॅश 1.700 मेट्रीकटन दर रूपये 28,000/- प्रती मे.टन साठा पान नंबर 19 वर नोंद घेऊन दिनांक 29/04/2015 ला वाटप दर्शविले आहे. परंतु पक्षी प्राप्त नसतांना सदर फीड/खादय वाटपाचे प्रोव्हिजन काय होते ही अनियमितता झालेली आहे.

3) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक 1083/1074/ दिनांक 09/01/1983 नुसार राबविण्यात येणारी योजना सफल झाल्याबाबत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांनी तपासणी करणे आवश्यक असतांना तशी तपासणी करून फलश्रृती अहवाल दिलेला नाही.

**4.446 सादिल देयक प्रिन्टर खरेदी मधील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती कोरची, जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना कोरची, यांनी कार्यालयीन उपयोगाकरीता एच.पी.लेजर प्रिन्टर जेट 1005 मे.पार्थ कॉम्प्युटर, गडचिरोली कडून पुरवठा आदेश एक.वि.से.यो.को./स्था-1/89, दिनांक 09/03/2015 बिल क्रमांक 63 दिनांक 19/03/2015 रक्कम रूपये 13,300/- अन्वये खरेदी केल्याचे दिसुन येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली, यांचे अधिकाराचे प्रत्यायोजन (Delegation of power) आदेश जिपग/साप्रवि/स्था-2/1416/2015, दिनांक 07/01/2015 अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांना वापर करून बाल विकास प्रकल्प अधिकारी, कोरची यांचे आदेश क्रमांक एबा.वि.से.यो.को./स्था/154/2015 दिनांक 31/03/2015 अन्वये कार्यालयाकरीता प्रिन्टर खरेदी रक्कम रूपये 13,300/- ला मंजुरी प्रदान केलेली आहे. परंतु दिनांक 07/01/2015 चे आदेशानुसार बाल विकास प्रकल्प अधिकारी हे सदर सादिल खर्चास मंजुरी प्रदान करणेस्तव सक्षम नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदर खर्चास प्रदान केलेली मंजुरी नियमानुसार नाही.

2) मे.पार्थ कॉम्प्युटर सेल सर्व्हिस गडचिरोली, जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 20 व 21 नुसार मुद्रांक पावती प्राप्त केलेली नाही.

3) दरपत्रकास व न्युनतम दरास संवर्ग विकास अधिकारी यांची मान्यता घेतलेली नाही.

**4.447 50 टक्के अनुदानावर एक दिवसीय सुधारीत कुक्कूट पिलाचे गट वाटप व पशुखादय वाटप मधील अनियमितता.**

**पंचायत समिती कोरची, जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** बिगर आदिवासी उपयोजना अंतर्गत एकुण रक्कम रूपये 63,600/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजनेच्या स्वरूपानुसार 50 टक्के अनुदानावर एक दिवसीय कुक्कूट पिल गट वाटप व कुक्कूट खादय (चिकमॅश) लाभार्थ्यांना वाटप करावयाचे असतांना लाभार्थी हिस्सा 50 टक्के न घेता 100 टक्के अनुदानावर लाभ दिल्याचे दिसुन येते.

2) अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याने योजनेस व्यापक प्रसिध्दी देवुन अर्ज मागवून प्राप्त अर्ज स्विकारून जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद मार्फत निवड समितीच्या मान्यतेस सादर करणेस्तव शासन निर्णय जिवायो 2010/प्र.क्र.-312/पदुम-4, दिनांक 16/09/2010 नुसार सुचना असतांना लाभार्थी निवडीस मान्यता घेतल्याने आढळुन आले नाही. लाभार्थी निवड पंचायत समिती स्तरावर केल्याचे दिसुन येते.

3) लाभार्थी 33 टक्के महिला लाभार्थी आवश्यक असतांना एकही महिला लाभार्थीचा समावेश नाही.

4) विनियोजन प्रमाणपत्र प्राप्त केल्याचे आढळुन आले नाही.

5) लाभार्थ्यांनी 50 टक्के हिस्सा रक्कम रूपये 8,000/- स्वत: उभारून पिलाच्या गटासाठी निवारा, वाहतुकीकरीता खर्च, उर्वरीत खादयावरील खर्च, औषधी, पाण्याची भांडी, खादयाची भांडी इत्यादीवरील खर्च करावयाचा आहे. परंतु असे आढळुन आले नाही.

6) 50 टक्के अनुदानावर एक दिवसीय सुधारीत कुकूट पिलाने गट वाटपाचे पंचायत समिती कोरची करीता 8 x 2000 = 16,000/- रूपये चे आदेश जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचे पत्र क्रमांक जिपग/पशुक्र/45/151/2015 अन्वये सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, प्रादेशिक उंडी उबंवणी केंद्र, नागपुर यांना दिले होते. त्यांचे बिल क्रमांक 19 दिनांक 16/03/2015 रक्कम रूपये 16,000/- प्राप्त झाले. त्यांचे शोधन पंचायत समिती कोरचीने धनादेश क्रमांक 015934 दिनांक 31/03/2015 अन्वये केलेले आहे. परंतु एक दिवसीय पिलाचे गट प्राप्त झालेले नाही. त्यामुळे माल प्राप्त न होता केलेले रक्कम रूपये 16,000/- चे शोधन नियमबाहय आहे.

7) शासन निर्णय दिनांक 16/09/2010 योजनेचे मार्गदर्शन तत्वे 11 नुसार लाभार्थ्यांना एक दिवसीय पिलाने गट पुरविले जातील. त्याचवेळी खादय वाटप करण्याची दक्षता घ्यावी असे असतांना एक दिवसीय पिलाचे गट प्राप्त झालेले नसतांना 8 लाभार्थ्यांना पशुखादय(चिकमॅश) 1.700 M.T. रक्कम रूपये 47,600/- प्राप्त (34Kg x 50Kg) चे वाटप साठापुस्तक पेज क्रमांक 1 नुसार केलेले आहे ते नियमबाहय आहे. त्यामुळे रक्कम रूपये 47,600/- वसुल ठरते.

8) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 20 व 21 नुसार पुरवठादाराने पोच पावत्या केलेल्या नाही.

**4.448 विशेष घटक योजनांतर्गत दुधाळ जनावरे वाटपातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती पाथरी, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 25) -** पंचायत समिती, पाथरी अंतर्गत सन 2014-15 या वित्तीय वर्षामध्ये प्रत्येकी एक दुधाळ जनावरे (म्हैस) खरेदीसाठी एकुण रुपये 7,65,549/- पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचे नावे रक्कम आहरण करुन म्हैस खरेदीसाठी प्रदान केल्याचे दिसुन आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 प्रमाणे लाभार्थी निवड समिती गठीत करुन व योग्य ते निकष लावुनच लाभार्थी निवड करणे आवश्यक आहेत तथापि अशी कार्यवाही केल्याबाबत दिसुन आले नाही. त्यामुळे निवडलेले लाभार्थी योग्य निकष लावुनच निवडल्याबाबत तपासणी करता आली नाही.

2) उक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचना क्रमांक 12 प्रमाणे खरेदी समिती गठीत करणे आवश्यक असताना संचीकेतील खरेदीच्या प्रमाणपत्रावर केवळ पशुधन विकास अधिकारी (विस्तार), विमा प्रतिनीधी व लाभार्थी यांच्याच सहया आढळुन आल्या आहेत. सहकारी दुध संस्थेचे प्रतिनिधी, कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन पर्यवेक्षक/पशुधन विकास अधिकारी, बँक प्रतिनिधी यांच्या स्वाक्षऱ्या आढळुन आल्या नाहीत.

3) सदरील योजनेच्या मार्गदर्शक सुचाना क्रमांक 20 प्रमाणे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी वाटप केलेल्या दुधाळ जनावरांच्या 25 टक्के जनावराची प्रत्यक्ष पडताळणी करावी तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी 10 टक्के जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करुन तसा अहवाल वरिष्ठास सादर करणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झाल्याचे दिसुन आले नाही.

4) उक्त योजना ज्या उददेशासाठी राबवण्यात आली तो उददेश सफल झाल्याबाबत फलश्रुती अहवाल जोडला नाही.

**4.449 विशेष घटक योजना अंतर्गत दुधाळ जनावरे वाटप योजनेतील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती गंगाखेड, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती, गंगाखेडमध्ये सन 2014-15 या वित्तीय वर्षामध्ये विशेष घटक योजना अंतर्गत दुधाळ जनावरे वाटप करणेसाठी सन 2013-14 मध्ये प्रदान करण्यात आलेल्या अग्रीम रकमेचे समायोजन व सन 2014-15 साठी अग्रीम दिल्याचे आढळुन आले यावर रुपये 6,80,488/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.305/पदुम-4,दिनांक 22/11/2011 प्रमाणे लाभार्थी निवड समिती गठीत करुन व योग्य ते निकष लावुनच लाभार्थी निवड करणे आवश्यक आहेत. तथापि अशी कार्यवाही केल्याबाबत दिसुन आले नाही लेखापरीक्षणात सदरील योजनेबाबत सादर संचीका तपासली असता त्यात सन 2013-14 साठी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी कळवलेल्या/निवड केलेल्या लाभार्थी निवड यादीतील नावाप्रमाणे चार लाभार्थ्यांना या योजनेचा दुसऱ्या टप्प्याचा लाभ दिला आहे तथापी सदरील योजनेच्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे पहिली म्हैस आटली किंवा कसे याबाबत कागदपत्रे/लाभार्थ्याचा अर्ज संचीकेत आढळुन आली नाही तसेच निवडलेले लाभार्थी योग्य निकष लावुनच निवडल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

2) सन 2013-14 चे सादर संचीकेची तपासणी केली असता त्यात सदरील जनावरे लोहा येथील बाजारातुन दिनांक 11/11/2014 ते 13/01/2015 या कालावधीत खरेदी केल्याबाबत जनावर दाखल्यावरुन दिसुन आले. तथापि सदरील जनावरांचा विमा मात्र दिनांक 05/03/2015 रोजी काढला आहे याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) सन 2014-15 मधील सदरील योजनेचा लाभ घेण्यासाठी सहा लाभार्थ्यांनी दिनांक 16/01/2015 ते 26/03/2015 या कालावधीत प्रत्येकी रुपये 21,265/- प्रमाणे एकुण रुपये 1,27,590/- चा भरणा ब ठेवी या लेखाशिर्षात करुन उक्त खरेदीसाठी उपरोक्त प्रमाणक क्रमांक 225 द्वारे सदरील लाभार्थी हिस्सा व प्रमाणक क्रमांक 226 द्वारे शासन अनुदानाची रक्कम रुपये 3,82,776/- असे एकुण रुपये 5,10,366/- पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांना अग्रीम स्वरुपात प्रदान केले आहेत. तथापी लेखापरीक्षण कालावधीपावेतो सदरील अग्रीमाचे समायोजन झाल्याचे दिसुन आले नाही. त्यामुळे दुधाळ जनावरे खरेदी केल्याबाबत व संबंधीत लाभार्थ्यांना वाटप केल्याबाबत प्रमाणित करता येत नाही.

4) सदरील योजनेसाठी उक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचना क्रमांक 17 प्रमाणे सदर योजना राबवताना प्रथमत: एका दुधाळ जनावराचे वाटप करण्यात यावे व सहा महिन्यानंतर किंवा सदरचे वाटप केलेले दुधाळ जनावर आटल्यानंतर (यामध्ये जो कालावधी कमी असेल तदनंतर) दुसरे दुधाळ जनावर वाटप करण्यात यावे असे नमुद आहे प्रस्तुत योजनेची सादर संचीका तपासली असता त्यात सहा लाभार्थ्यांसाठी प्रत्येकी एकच दुधाळ जनावर खरेदी करण्यासाठी अग्रीम देणे आवश्यक आहे व त्यानंतर दुस-या दुधाळ जनावर खरेदीसाठी रक्कम प्रदान करणे आवश्यक आहे तथापी संपुर्ण रकमेचे आहरण एकदाच करुन प्रदान केले आहे.

5) सदरील योजनेअंतर्गत दुधाळ जनावरे खरेदी करताना संबंधीत विक्रेत्यास रोखीने अदाई केल्याचे दिसुन आले आहे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 29(4) नुसार रुपये 1,000/- रुपयाहू न अधिक रक्कम द्यावयाचे असेल तर ती रेखीत धनादेशाव्दारे घेणाऱ्याच्या खाती जमा करणे आवश्यक आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणी पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचे नावे धनादेश देण्यात येवून विक्रेत्यास खरेदीची किंमत रोखीने अदाई करुन नियमबाहयता करण्यात आली आहे.

6) उक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचना क्रमांक 12 प्रमाणे खरेदी समिती गठीत करणे आवश्यक असताना संचीकेतील खरेदीच्या प्रमाणपत्रावर केवळ पशुधन विकास अधिकारी (विस्तार), विमा प्रतिनीधी व लाभार्थी यांच्याच सहया आढळुन आल्या आहेत.

7) सदरील योजनेच्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे पशुधण अधिकारी (विस्तार ) यांनी 20 टक्के, पशुधन विकास अधिकारी यांनी 25 टक्के व जिल्हा पशुधन अधिकारी यांनी 10 टक्के जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करुन तसा अहवाल वरिष्ठास सादर करणे आवश्यक आहे तथापी अशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

**4.450 कामधेनू दत्तक ग्राम योजनासाठी प्रदान रकमातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती पालम, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती पालमने सन 2014-15 या वित्तीय वर्षामध्ये कामधेनु दत्तक ग्राम योजनांतर्गत रुपये 2,58,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरील योजनेसाठी महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक नापुयो-2010/प्र.क्र.50/पदुम-4, दिनांक 29/10/2010 तथा शुध्दीपत्रक दिनांक 16/12/2011 प्रमाणे 1) पशुपालक मंडळ स्थापन करणे व सहलीचे आयोजन करणे रुपये 7,000/-, 2) जंतनाशन शिबीर रुपये 17,500/-, 3) खनिज द्रव्य मिश्रण व जीवनसत्व पुरवठा रुपये 40,000/-, 4) गोचीड गोमाशी निर्मुलन शिबीर रुपये 13,000/-, 5) व्यंधत्व निदान व औषधोपचार शिबीर रुपये 22,000/-, 6) वैरण विकास कार्यक्रम रुपये 17,000/-, 7) निकृष्ठ चारा सकस करणे ईत्यादी रुपये 5,000/-, 8) प्रसिध्दी व प्रचार रुपये 21,000/-, 9) नावीन्य पुर्ण उपक्रम राबविणे रुपये 5,000/- व 10) जनावरांचे मलमुत्र व वाया गेलेल्या चाऱ्याचे खत व्यवस्थापन करणे, प्रशिक्षण व प्रात्यक्षीके रुपये 5,000/- असे एकुण रुपये 1,52,500/- प्रत्येक निवड केलेल्या एका दत्तक गावाकरिता अनुज्ञेय आहेत. तथापि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी त्यांचे अनुदान वितरण आदेश जावक क्रमांक जिपप/पसंवि/तांत्रिक/948/2014, दिनांक 26/06/2014 अन्वये उपरोक्तपैकी 6 दत्तक गावांसाठी केवळ बाब क्रमांक 1, 7, 8, 9 व 10 साठी प्रत्येकी रुपये 43,000/- प्रमाणे सन 2014-15 साठी एकुण रुपये 2,58,000/- अनुदान वितरण केले आहे. त्यामुळे शासन निर्णयातील ईतर बाबींसाठी अनुदान वितरीत न करणेबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) सदरील योजनेसाठी पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी रकमेचे आहरण करुन सहा पशुवैदयकीय दवाखाना मधील पशुधन विकास अधिकारी / पशुधन पर्यवेक्षक यांना प्रत्येकी रुपये 43,000/- वितरीत केले आहेत. तथापि उक्त दत्तक ग्रामांची निवड शासन निर्णय दिनांक 29/10/2010 मधील परिच्छेद 1 मधील निकषानुसार केल्याबाबत दर्शवणे आवश्यक आहे.

3) सदरील योजनेसाठीची तरतुद सन 2014-15 मध्येच दिनांक 26/06/2014 रोजी प्राप्त झालेली असताना उशीराने म्हणजे मार्च-2015 मध्ये आहरण करुन वितरीत केली आहे. हि बाब योग्य नाही.

4) उक्त तरतुद पशुवैदयकीय दवाखान्यांनी सन 2014-15 मध्येच विवक्षीत बाबीवर खर्च करणे आवश्यक असताना लेखापरीक्षण कालावधीपर्यंत सदरील रकमा खर्च करण्यात आल्याचे दिसुन आले नाही.